आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ जुलै २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- नीती आयोगाचं संपूर्णता अभियान देशभरात सुरू, महाराष्ट्रातल्या २७ तालुक्यांचा समावेश
- कोणत्याही स्वरूपातल्या दहशतवादाचं समर्थन, किंवा माफी शक्य नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेत स्पष्टोक्ती
- झारखंडचे नवे मुख्यमंत्री म्हणून झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांचा शपथविधी
- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स पहिल्यांदाच ८० हजाराच्या उच्चांकी पातळीवर बंद

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून मायदेशी परतलेल्या भारतीय संघाची मुंबईत विजयी मिरवणूक

<><><><><>

नीती आयोगाचं संपूर्णता अभियान आजपासून देशभरात सुरू झालं. ४ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान देशातल्या ५०० तालुक्यांत हे अभियान राबवलं जाणार आहे. या अभियानामार्फत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमधल्या, एकूण २७ तालुक्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

<><><><><>

कोणत्याही स्वरूपातल्या दहशतवादाचं समर्थन केलं जाऊ शकत नाही, किंवा त्याला माफी दिली जाऊ शकत नाही, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या कझाकस्तानमधे अस्ताना इथं होत असलेल्या शिखर परिषदेत सांगितलं. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी प्रधानमंत्र्यांचं भाषण वाचून दाखवलं. दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या किंवा त्यांना माफी देणाऱ्या देशांना आंतरराष्ट्रीय समुदायानं एकटं पाडण्याची गरज मोदी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. युवा पिढीमध्ये कट्टरतावाद पसरणार नाही, याची आपण काळजी घ्यायला हवी, असं मोदी म्हणाले. हवामान बदलाच्या समस्येचाही त्यांनी ऊहापोह केला.

<><><><><>

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी आज झारखंडचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं झालेल्या कार्यक्रमात सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी उच्च न्यायालयानं सोरेन यांना जामीन दिल्यानंतर काही दिवसांतच त्यांनी तिसऱ्यांदा झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्या आधीचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी काल पदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्यपालांना भेटून सत्तास्थापनेचा दावा केला होता.

<><><><><>

नवे फौजदारी कायदे नागरिकांसाठी जीवनसुलभता आणतील असा विश्वास केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी व्यक्त केला आहे. ते आज उत्तरप्रदेशात गाझीयाबाद इथल्या सीबीआय अकादमीत बोलत होते. या कायद्यांमुळे न्यायदानाची गती वाढेल, आणि खटल्यांमधे खर्च होणारा सर्व संबंधितांचा वेळ वाचेल, असं ते म्हणाले.

यावेळी ३९ सीबीआय अधिकाऱ्यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपतींचं सेवापदक तसंच गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल भारतीय पोलीस पदक मेघवाल यांनी प्रदान केलं.

**<><><><><>**

खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी देशभरातल्या सर्व न्यायालयं आणि न्यायाधिकरणांमधे उत्तम पायभूत सुविधांची गरज सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केली आहे. ते आज मुंबईत रोखे अपीलीय न्यायाधिकरणाच्या नव्या कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर दूरदर्शनशी बोलत होते. प्रत्यक्षातल्या तसंच आभासी माध्यमातून होणाऱ्या कामकाजासाठीही या सुविधांची गरज आहे, असं त्यांनी सांगितलं. गेल्या काही वर्षात भांडवली बाजाराचा बहुस्तरीय विस्तार झाला आहे. हे लक्षात घेता गुंतवणूकदारांचं हितरक्षण करण्यासाठी न्यायाधिकरणाच्या अतिरिक्त शाखा असणं आवश्यक आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी महाराष्ट्र विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेनं आज एकमतानं मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

विधानपरिषदेतल्या निवृत्त सदस्यांना आज निरोप देण्यात आला. वरिष्ठ सभागृहाचा नावलौकिक वाढवण्याचं काम या सदस्यांनी केल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढले. येणाऱ्या सदस्यांना या सदस्यांचं काम कामकाजाच्या नोंदीद्वारे अभ्यासता येईल आणि यातून प्रेरणा मिळेल असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी ७१ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत १ लाख १० हजार हेक्टरची वाढ झाल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत दिली. आतापर्यंत १०१ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्यावर्षीच्या ३ जुलैच्या तुलनेत हे प्रमाण २० लाख हेक्टरनं वाढलं आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यात कुठेही खतं आणि बियाणांचा तुटवडा नाही. नियोजनापेक्षा अधिक खतं आणि बियाणं उपलब्ध आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज पहिल्यांदाच ८० हजाराच्या उच्चांकी पातळीवर बंद झाला. कालच सेन्सेक्सनं ही पातळी ओलांडली होती, मात्र दिवसअखेर तो या पातळीखाली बंद झाला होता. आज दिवसअखेर ६३ अंकांची वाढ नोंदवत तो ८० हजार ५० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ३०२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून आज बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघानं दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. प्रधानमंत्र्यांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली आणि संपूर्ण देशाला त्यांचा अभिमान वाटत असल्याचं सांगितलं. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्ली विमानतळावर विश्वविजेत्या संघाचं स्वागत केलं. मोठा जनसमुदाय विमानतळाबाहेर उपस्थित होता.

हा विश्वविजेता संघ आज संध्याकाळी मुंबईत पोचला. विमानतळावर अग्निशमन दलाकडून त्यांच्या विमानावर पाण्याचे फवारे मारून त्यांचं स्वागत करण्यात आलं.  विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कर्णधार रोहित शर्मा याच्या हातून केक कापून या क्रिकेटपटूंचं कौतुक केलं. त्यानंतर भारतीय संघाची विजयी

मिरवणूक सुरु झाली. अनेक ठिकाणी ढोलताशा पथकं या मिरवणुकीत सहभागी झाली आहेत. खुल्या बसमध्ये भारतीय खेळाडू क्रिकेट प्रेमींना अभिवादन करत त्यांच्याकडून होणारा कौतुकाचा वर्षाव स्वीकारत आहेत. हजारो क्रिकेटप्रेमींनी मरीन ड्राइव्हवर गर्दी केली आहे. यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली आहे.

<><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीतल्या पुरूष दुहेरीत भारताच्या युकी भांबरीनं आपल्या फ्रेंच जोडीदार अल्बानो ओलिव्हेट्टी याच्या साथीनं कझाकस्तानच्या अलेक्झांडर बुबलिक आणि अलेक्झांडर शेवचेंको या जोडीला पराभूत केलं. लंडनमधे झालेल्या या सामन्यात भांबरी- अल्बानो जाेडीनं प्रतिस्पर्धी जोडीचा ६-४, ६-४ असा पराभव केला.

भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यु हेडन या जोडीनंही काल रात्री झालेल्या पहिल्या फेरीतल्या पुरूष दुहेरीच्या सामन्यात सांदेर अरेंदस आणि रॉबिन हासे या डच जोडीचा ७-५,६-४ असा पराभव केला.

<><><><>

पॅरिस इथं होणाऱ्या ऑलम्पिक स्पर्धेआधी बहुतेक खेळाडूंना वैयक्तिक प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य द्यायला केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या एम ओ सी, अर्थात मिशन ऑलिम्पिक विभागानं मान्यता दिल्याचं विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज सांगितलं. यात नेमबाज रिदम संगवान, सरबज्योत सिंग, विजयवीर आणि अनिश भानवाला यांचा समावेश आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बाविसाव्या भारत रशिया वार्षिक परिषदेसाठी  ८ आणि ९ जुलै रोजी रशियाचा दौरा करणार आहेत. रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन यांनी मोदी यांना आमंत्रण दिलं असून या परिषदेत दोन्ही देशांच्या प्रादेशिक तसंच जागतिक प्रश्नांविषयी चर्चा होईल, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली

आहे. त्यानंतर प्रधानमंत्री ९ आणि १० जुलै रोजी ऑस्ट्रियाचा दौरा करतील. ४१ वर्षांनंतर प्रथमच भारताच्या प्रधानमंत्र्यांचा ऑस्ट्रिया दौरा होत आहे. या दौऱ्यात मोदी ऑस्ट्रियाचे राष्ट्रपती अॅलेक्झांडर वॅन देर बेलेन यांची भेट घेणार आहेत. तसंच, ऑस्ट्रियाचे चॅन्सेलर कार्ल नेहमार यांच्याशी चर्चाही करणार आहेत.

**<><><><><>**

संसद अधिवेशनादरम्यान लोकसभेत खासदारांच्या शपथविधीच्या वेळी घोषणाबाजी झाल्यानंतर सभापती ओम बिरला यांनी त्यासंबंधीच्या नियमात बदल केला आहे. सुधारित नियमानुसार कोणत्याही सदस्याला शपथ घेतेवेळी शपथेच्या मजकुराव्यतिरिक्त इतर काहीही घोषणा किंवा शेरा देता येणार नाही.

**//<><><><><>//**